कृतिपत्रिका

# विशेष सराव परीक्षा क्र. 1 (2021-2022)

1003

दिनांक :  इयत्ता : 12 वी  गुण : 80

परीक्षा क्रमांक :  विषय: मराठी  वेळ : 3 तास

## विभाग 1 : गद्य (गुण 20)

**प्रश्न 1 अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** 8

**1) पुढील चौकटी पूर्ण करा.**

i) आनंदाला आकर्षित करणारा – ☐ 1

ii) आपल्या अस्तित्त्वाची साक्ष देणारा – ☐ 1

**2)** i) उताऱ्यातील म्हण ओळखून चौकटीत लिहा. ☐ 1

ii) योग्य की अयोग्य ते लिहा –

आनंदाच्या झऱ्याचा उगम आपल्या अंतरंगातच असतो. ☐ 1

आनंद सगळ्यांनाच हवा असतो... पण आपला आनंद नेमका कशात आहे, हे अनेकांना कळत नसतं. आनंद म्हणजे नेमकं काय हेही उलगडलेलं नसतं. कुठे असतो हा आनंद ? कुठे नसतो हा आनंद ? आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे ! ही फक्त कविकल्पनाच नव्हे, तेच सत्य आहे, किंबहुना शाश्वत सत्य आहे !

आनंदाची गंमत अशी आहे, की तुम्ही शोधू लागलात, की तो दडून बसतो, पकडू गेलात, की हातातून निसटतो. आनंदासाठी जितका आटापिटा कराल, तितका तो हुलकावण्या देतो. जितका सहजपणे घ्याल, तितका आनंद सहज प्राप्त होतो. आनंद असतोच तो अनुभवता मात्र यावा लागतो.

आनंदाच्या बाबतीत कळसा काखेत असूनही आपण गावाला वळसा घालीत असतो. आनंद आपण बाहेर शोधत असतो आणि तो मात्र आत असतो. आनंद आपल्या मनातच असतो. आनंदाच्या झऱ्याचा उगम आपल्या अंतरंगातच असतो.

हे खरं आहे, की आनंद सर्वत्र असतो; पण अंतरंगात आनंद असेल, तरच तो अनुभवता येतो. आनंदाचं नातं जुळतं, ते फक्त आनंदाशी, आनंदाला आकर्षित करतो, तो फक्त आनंदच. आनंदाला प्रसवतो, तोही आनंदच.

आनंदाचं भान जागृत ठेवणं हेच आनंदाचं रहस्य आहे. असंख्य, अगणित पातळ्यांवर आनंद अनुभवता येतो. आपल्या आयुष्यासोबत ज्याचं अस्तित्व असतं, तो म्हणजे अस्तित्वाचा आनंद. आपलं अस्तित्व आपण नेहमीच गृहीत धरून चालतो आणि अस्तित्वाच्या आनंदाला मुकतो. आपल्या अस्तित्वाची साक्ष देत असतो, तो आपला श्वास.

**3) स्वमत :** 4

'प्रत्येक माणसाला आपल्या अस्तित्वाचे भान असणे अत्यंत गरजेचे आहे' तुमचे मत लिहा.

किंवा

तुमचे जीवन आनंदी होण्यासाठी तुम्ही काय कराल, ते तुमच्या शब्दांत लिहा.

**आ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** 8

**1) कृती करा.** 2

लेखकांचा परशा झाला तेव्हा त्यांना जाणवलेल्या बाबी → ☐
→ ☐

(P.T.O.)

**2) चौकटी पूर्ण करा.**

i) माणसाला कोणत्या गोष्टी चुकवता येत नाहीत – [ ............... ] 1

ii) दुखऱ्या दाताला कोणती गोष्ट खपत नाही – [ ............... ] 1

मला त्यावेळी परशाचे हसू आले; पण काही काळानंतर माझाही जेव्हा परशा झाला तेव्हा माझा नक्षा पार उतरला. माणसाला मरण आणि दातदुखी चुकवताच येत नसावी. किंबहुना दात ह्या इंद्रियाचे एक कार्य दुखणे हेच असावे. जन्मात एकदाही दात न दुखलेला मनुष्य मला तरी अजून आढळलेला नाही. असा कुणी असलाच, तर तो कमनशिबीच असला पाहिजे. ब्रह्मांड पाहण्याचा योग त्याच्या नशिबी नाही.

अनेक वर्षे समोर येईल ते मिटल्या डोळ्यांनी चावणारा माझा दात एके दिवशी काही कारण नसताना ठणकू लागला. असा ठणकू लागला, की त्याने माझी अवस्था हीनदीन झाली. दात ठणकू लागल्याबरोबर मी पहिली गोष्ट कोणती केली असेल तर ही, की ज्यांच्या ज्यांच्या दाढदुखीची अवहेलना केली होती, त्या सर्व माणसांची त्यांच्या दात व दाढांसकट मनातल्या मनात क्षमा मागितली.

दात दुखायला लागला, की तो मुळापासून दुखू लागतो. किंबहुना दाताला मूळ असते हे फक्त तो दुखायला लागला म्हणजेच कळते. माझा दात जेव्हा दुखायला लागला तेव्हा तर माझी खात्रीच झाली, की आपण आरोग्यशास्त्राच्या पुस्तकात पाहिलेले दाताचे चित्र आणि प्रत्यक्ष आपले दात यांत फार फरक असला पाहिजे. आपल्या दाताला मूळ नसून झांडासारख्या मुळ्या असल्या पाहिजेत. आणि त्या हिरड्यांत सर्वत्र पसरल्या असल्या पाहिजेत. नाहीतर सगळेच दात दुखत असल्याचा भास मला का व्हावा? प्रत्येक दाताला हात लावून पाहिल्यानंतर ज्या दाताने शंख करायला लावला, तो दुखरा दात याची खात्री झाली. दुखऱ्या दाताला लहानसा स्पर्शसुद्धा खपत नाही ! बरे, हे दुखणे तरी साधे, सरळ असावे ? तेही नाही. एखाद्या कवीच्या मनातील जिप्सीसारखा एखादा लाकूडतोड्या माझ्या दाताच्या मुळाशी खोल बसलेला असतो आणि तो एकामागून एक घाव घालीत असतो.

**3) लेखकांचा दात दुखायला लागतो; तेव्हा त्यांच्या मनातील विचार तुमच्या शब्दांत लिहा. किंवा 'दातदुखी' विषयी तुम आलेला अनुभव लिहा.**

**इ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**1) चौकटी पूर्ण करा –**

i) दूरचित्रवाणीवरील विषय – [ ............... ]

ii) दृक श्राव्य माध्यमातील कार्यक्रम पाहू व ऐकू शकणारे माध्यम – [ ............... ]

दृक्–श्राव्य माध्यमातील कार्यक्रम आपण एकाच वेळी पाहू व ऐकू शकतो. म्हणजेच या माध्यमातील कार्यक्रमांद्वारे आपल्याला एकाच वेळी पडद्यावर चित्र दिसते आणि वाणीही ऐकू येते. तसेच, एका केंद्रातून प्रक्षेपित केलेला कार्यक्रम जगभरात दूरवर कोणत्याही ठिकाणी दिसू शकतो. म्हणून या माध्यमाला ''दूरचित्रवाणी' असे म्हणतात. 1990 पर्यंत या माध्यमावर केंद्र सरकारचे संपूर्ण नियंत्रण होते. एकाच वाहिनीवरून सर्व कार्यक्रम प्रक्षेपित व्हायचे. मात्र, त्यामुळे सर्व प्रकारच्या प्रेक्षकांच्या गरजा भागवणे कठीण होऊ लागले. म्हणून क्रीडा, मनोरंजन, चित्रपट, बातम्या इत्यादी विषयांना वाहिलेल्या वाहिन्या निर्माण झाल्या आणि खाजगी वाहिन्यांची निर्मिती झाली. सर्व सरकारी व खाजगी वाहिन्या मिळून एकत्रितपणे या माध्यमाला 'दूरचित्रवाणी' म्हणतात आणि सरकारी नियंत्रणाखालील वाहिन्यांना 'दूरदर्शन' म्हणतात.

2) चौकटी पूर्ण करा –

i) दूरचित्रवाणीवरील 1990 पर्यंत यांचे नियंत्रण होते – ..............

ii) सर्व प्रकारच्या प्रेक्षकांच्या गरजा भागवणे कठीण झाले, कारण – ..............

**विभाग 2 : पद्य (गुण 16)**

**प्रश्न 2 अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**1) एका शब्दात उत्तरे लिहा.**

i) कवीची नेहमी सोबत करणारे –

ii) माणसाच्या अंधकारमय जीवनात साथ देणारा –

**2) योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| i) माणसांची मध्यरात्र<br>ii) माझा पेटण्याचा सोहळा | अ) इतरांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याची वृत्ती<br>ब) माणसांच्या आयुष्यातील नैराश्य<br>इ) नैराश्यातील आशेचा किरण |

रंगुनी रंगांत साऱ्या रंग माझा वेगळा !
गुंतुनी गुंत्यांत साऱ्या पाय माझा मोकळा !
कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे;
मी असा की लागती ह्या सावल्यांच्याही झळा !
राहती माझ्यासवें हीं आसवें गीतांपरी;
हें कशाचें दुःख ज्याला लागला माझा लळा !
कोणत्या काळीं कळेना मी जगाया लागलों
अन् कुठे आयुष्य गेलें कापुनी माझा गळा !
सांगती 'तात्पर्य' माझें सारख्या खोट्या दिशा :
''चालणारा पांगळा अन् पाहणारा आंधळा !''
माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य मी :
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा !

3) **अभिव्यक्ती :** कवीच्या आयुष्याने केलेली त्याची फसवणूक तुमच्या शब्दांत लिहा.

**आ) खालील ओळींचा अर्थ लिहा.** 4

नाही बेणं ग, मन दाबते
बाई दाबते
काड्या – काड्यांनी, संसार सांधते
बाई सांधते.

**इ) कृती करा (कोणतेही 1)** 4

1) काव्यसौंदर्य –

सत्त्व उतारा देऊन । अवघा सारिला तमोगुण ।
किंचित राहिली फुणफुण । शांत केली जनार्दनें ।।

या ओळींतील भावसौंदर्य स्पष्ट करा.

किंवा

2) रसग्रहण –

अंगणात थांबलेल्या तुझ्या प्रेयस चांदण्याला
दार उघडून आत घेण्याचेही भान नाही ग तुला
बागेतली ती अल्लड जाईही पेंगुळतेय तुझी वाट पाहून पाहून
पण तू, तू मात्र झालीस अस्तित्वहीन प्राण हरवलेली पुतळी

**विभाग 3 : साहित्यप्रकार कथा (गुण 10)**

**प्रश्न 3 अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** 4

**1) आकृती पूर्ण करा :**

i) संवाद लेखनाचे घटक → [ ] [ ] 1

ii) भाषेची योजना कशी केली जाते → [ ] [ ] 1

संवाद : कथेतील संवाद हे चटपटीत, आकर्षक, वाचकाच्या भावविश्वाला स्पर्श करणारे आणि कथानकाला प्रवाही ठेवणारे असतात. पात्रांच्या स्वभावधर्मानुसार व परिस्थितिजन्य घटकांनुसार संवाद लिहिले जातात. या संवादात लय व आंतरिक संगती महत्त्वाची असते. संवादातून रसनिर्मिती आणि रसपरिपोष होत असतो. अर्थपूर्ण संवाद कथेला वेगळी उंची प्राप्त करून देतात.

भाषाशैली : कथानक भाषेच्या मदतीने साकार होत असते. कथेतील पात्रांच्या स्वभाव वैशिष्ट्यांनुसार व कथेतील वातावरणानुसार भाषेची योजना केली जाते. कथाकार, त्याचा दृष्टिकोन, त्याची अनुभव घेण्याची पद्धत यांनुसार कथेचे भाषारूप आणि शैलीविशेष निश्चित होत जातात. कथा लिहिताना साधारणतः प्रमाण भाषा आणि बोली भाषा यांची सरमिसळ केली जाते. तसेच कथा पूर्णपणे बोलीभाषेतही लिहिली जाते.

**2) कथेतील भाषाशैली विषयी माहिती लिहा.** 2

**आ) खालीलपैकी दोन कृती सोडवा.** 6

1) 'शोध' या कथेतील अनुची स्वभावचित्र तुमच्या शब्दांत रेखाटा.

2) गुरुजींचा मुलगा वारल्यानंतर बोर्डिंगातल्या मुलांच्या झालेल्या अवस्थेचे वर्णन करा.

3) कथेच्या 'शोध' या शीर्षकाची समर्पकता तुमच्या शब्दांत पटवून द्या.

4) 'गढी' या कथेतील वैदर्भी बोलीचे तुम्हाला जाणवलेले वेगळेपण लिहा.

**विभाग 4 : उपयोजित मराठी (गुण 14)**

**प्रश्न 4 अ) खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** 4

1) मुलाखतीचे हेतू सांगा.

2) माहितीपत्रक म्हणजे काय ते सोदाहरण सांगा.

3) अहवाल लेखनाची आवश्यकता लिहा.

4) उमेदवार 'आतून' जाणून घेणे अत्यंत गरजेचे असते, हे सोदाहरण स्पष्ट करा.

**आ) खालीलपैकी दोन कृती सोडवा.** 10

1) 'मुलाखतीची पूर्वतयारी कशी करावी' हे खालील मुद्यांच्या आधारे माहिती लिहा. (मुलाखतदात्याची वैयक्तिक माहिती – मुलाखतदात्याचे कार्य – मुलाखतीच्या अनुषंगाने वाचन)

2) एका 'वैज्ञानिक खेळण्यांचे दालन' आकर्षक माहितीपत्रक तयार करा.

3) खालील विषयावर अहवालाचे लेखन करा.

तुमच्या गावातील कोरोना रोखण्याबाबत केलेल्या उपाययोजना.

4) खालील व्यक्तींची मुलाखत घेण्यासाठी प्रश्नावली तयार करा.

'सीमेवर असणारा सैनिक.'

**विभाग 5 : व्याकरण व लेखन (गुण 20)**

**प्रश्न 5 अ) सूचनेनुसार कृती करा.** 10

**1) य) योग्य पर्याय निवडा :**

दवाखान्यात मोठ्या आवाजात बोलू नये. (होकारार्थी वाक्य ओळखा.) 1

i) दवाखान्यात हळू आवाजात बोलावे.

ii) दवाखान्यात मोठ्याने बोलावे का?

iii) खरचं, दवाखान्यात मोठ्याने बोलावे !

iv) दवाखान्यात मोठ्याने बोलणे टाळा.

**र) सूचनेप्रमाणे सोडवा.** 1

गुलाबी रंग सर्वांना आवडतो. (प्रश्नार्थी वाक्य करा)

**2) य) 'सुखदुःख' या सामासिक शब्दातील समास ओळखून लिहा.** 1

i) वैकल्पिक द्वंद्व समास

ii) समाहार द्वंद्व समास

iii) द्विगू समास

iv) कर्मधारय समास

**र) 'सप्तसिंधू' या सामासिक शब्दाचा विग्रह करा.** 1

**3) य) 'रामने वक्तृत्व स्पर्धेत बक्षीस मिळवले' या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.** 1

i) कर्तरी प्रयोग

ii) कर्मणी प्रयोग

iii) भावे प्रयोग

iv) यापैकी नाही

**र) कर्तरी प्रयोगाचे वाक्य ओळखून लिहा.** 1

i) ते पुस्तक वाचतात.

ii) आशाने फुलांची रोपे लावली.

iii) आम्ही अनेक किल्ले पाहिले

iv) मुलांनी क्रिकेट मॅच जिंकली.

**4) य) योग्य पर्याय निवडा.** 1

'हे नव्हे चांदणे, ही तर मीरा गाते.' वाक्यातील अलंकार ओळखून लिहा.

i) अनन्वय अलंकार

ii) अपन्हुती अलंकार

iii) अर्थान्तरन्यास अलंकार

iv) अतिशयोक्ती अलंकार

**र) उपमान ओळखून लिहा.** 1

'कर्णासारखा दानशूर कर्णच' या वाक्यातील उपमान ओळखून लिहा.

5) य) 'रंगून जाणे' वाक्प्रचाराचा अर्थ ओळखून लिहा. 1

i) अभिमान वाटणे

ii) चौकशी करणे

iii) पूर्णपणे मिसळून जाणे

iv) दुःखी होणे

र) 'कवणे गाणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा. 1

आ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 200 ते 250 शब्दांत निबंध लिहा. 1

1) श्रावणातला पाऊस

2) आमच्या शाळेतील शिपाईकाका

3) एका संगणकाचे मनोगत

4) पाऊस पडलाच नाही तर ....

5) विज्ञानयुगातील अंधश्रद्धा.

* * * * *